महाराष्ट्र राज्यातील सांविधिक संस्था, मंडळे, महामंडळे व सार्वजनिक उपक्रम यांतील अधिका-यांच्या विदेश दौ-याबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.सीडीआर-1094/प्रकरण-3/94/अकरा,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक: 30 मार्च 1994.

वाचा :- 1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-पीएसयू-1084/सीआर-174/जीईएन-1, दिनांक 21.4.1985.
2) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-1089/प्र.क्र.221/अर्थसंकल्प-19, दिनांक 15.1.1990,
3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-1191/181/4/91/11, दिनांक 8 फेब्रुवारी, 1991.

## परिपत्रक

वित्त विभागाच्या उपरोक्त आदेशानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी काटकसरीच्या उपाययोजना अवलंबिणे तसेच विदेश दौ-यावरील खर्च कमी करणे, त्याचप्रमाणे सार्वजनिक उपक्रमांतील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर अथवा प्रशिक्षणाव्यतिरिक्त परदेशी पाठविणे याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तावाची छाननी करण्यासाठी एक नमुना प्रपत्र विहित करण्यात आले आहे आणि अशा दौ-यांसाठी राज्य शासनाची पूर्व संमती अनिवार्य असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त आदेशानुसार असे स्पष्ट करण्यात आले आहे की, अशा दौ-यांबाबत केंद्र शासनाचे आदेश व मार्गदर्शक तत्वे यांचे पालन होणे आवश्यक आहे व त्यानुसार केंद्र शासनाच्या परवानगीसाठीचा प्रस्ताव प्रस्तावित विदेश दौ-याच्या किमान 3 आठवडे आधी पाठविणे आवश्यक आहे आणि केंद्र शासनाची संमती गृहित धरुन विदेश दौरा करण्यात येऊ नये असेही कळविण्यात आले आहे.

2. तथापि नुकतेच एका प्रकरणात असे आढळून आले आहे की, एका महामंडळाचे अध्यक्ष व काही अधिकारी यांच्या विदेश दौ-यासाठी राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती. याबद्दल त्या महामंडळाचा खुलासा असा होता की, महामंडळाचे अध्यक्ष शासन नियुक्त असल्याने त्यांच्या विदेश दौ-यासाठी शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असली तरी अधिकारी महामंडळाने नियुक्त केलेले असल्याने त्यांच्या विदेश दौ-यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक नव्हती.

3. महामंडळाचा वरील खुलासा शासनाने मान्य केलेला नाही. मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांना शासनाकडून अर्थसहाय्य पुरविण्यात येते व त्यांच्या एकूण कामकाजावर शासनाचे नियंत्रण असते. त्यामुळे मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांतील अधिकारी जरी शासनाने नेमलेले नसले तरीसुध्दा सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या उपरोक्त सर्व परिपत्रकांतील सूचनांचे कटाक्षाने पालन करणे सर्व सांविधिक संस्था/मंडळे/महामंडळे/ सार्वजनिक उपक्रम यांचेवर बंधनकारक आहे.

4. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख, मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, मंडळे व महामंडळे, सांविधिक तसेच शासकीय किंवा निमशासकीय संस्था यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी वरील आदेशांचे कटाक्षाने पालन करावे. सदर आदेशांचा भंग झाल्यास, शासन त्याची गंभीर दखल घेईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ग. मंडपे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मुख्य सचिवांच्या कार्यालयातील सह सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
× प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
× प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
× प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
× सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
× सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
× सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.8, 10, 12-अ, 19, 20, 28, 34,
गृह विभाग/पोल-1,
महसूल व वन विभाग/फ-7,
सर्व मंत्रालयीन विभाग (अधिक 5 प्रतींसह) सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती आहे की, त्यांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व सांविधिक संस्था, शासकीय तसेच निमशासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे व महामंडळे यांच्या निदर्शनास आणून त्यांचे कटाक्षाने पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख.

× <u>पत्राने.</u>

---

रोटा/एच-1419(1,500-4-94)